दि . १३/११/२०२५

प्रति,
पोलीस निरीक्षक साहेब,
शेंगाव पोलिस स्टेशन,
जिल्हा बुलढाणा -४४४३०३

अर्जदार :- अतुल समाधान पाटील वय: २८ वर्षे
रा. रावेर ता. खानापूर जि. जळगाव-४२५५०८
ह.मु. संजय बंडू बोराडे यांच्या घरी, SBI कॉलनी, माने नगर, गौलखेड रोड, शेंगाव.
मो. ९५४५३२१४०५

गैरअर्जदार :- 1) शुभम पंजाबराव आठवले वय: ३० वर्षे
मु. पो. कान्होली रामगाव ता. दर्यापूर जि. अमरावती--४४४८०३
मो. ९५५२२५९८६०

2) जितेंद्र यशवंत चव्हाण वय: ३४ वर्षे
मु. पो. कोव्हळा ता. दारव्हा जि. यवतमाळ- ४४५२०२
मो. ७६२०२७७१५०

3) यशकुमार कळसकर वय: २९ वर्षे
मु. चौसाळा ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती
मो. ७४९९२९३७०२

विषय :- अफरातफरीची तक्रार देण्यावावत.

महोदय,

या संदर्भात, आम्ही आपणास विनंती करतो की कृपया खालील तथ्ये लक्षात घ्या:

1. स्पंदना स्फूर्ती फायनान्शिअल लिमिटेड ही कंपनी कायदा, 2003 अंतर्गत अंतर्भूत केलेली कंपनी आहे, तिचे नोंदणीकृत कार्यालय गॅलॅक्सि विंग बी, १६ वा माळा, प्लॉट नं. १, हैदराबाद नॉलेज सिटी, TSIIC, रायदुर्ग पनमकथा, हैदराबाद, तेलंगणा, भारत – ५०००८१ येथे आहे आणि

2. स्पंदना स्फूर्ती फायनान्शिअल लिमिटेडचे प्रादेशिक कार्यालय: स्पंदना स्फूर्ती फायनान्शिअल लिमिटेड C/0 विनोद हिवराळे, ब्लॉक नंबर-19, ग्राउंड आणि सेकंड, नित्यानंद कॉलनी, अकोली रोड, साई नगर अमरावती-४४४६०५
3. शाखा कार्यालय- C/o ह.मु. संजय बंडू बोराडे यांच्या घरी, SBI कॉलनी, माने नगर, गौलखेड रोड, शेंगाव

4. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ("RBI") च्या मान्यतेने कंपनी Spandana Sphoorty Financial Limited ही बँकिंग नियमन कायदा, 1956 अंतर्गत RBI कडे नोंदणीकृत अनुसूचित व्यावसायिक बँक आहे. कंपनीच्या मुख्य उद्दिष्टामध्ये, इतर गोष्टींबरोबरच, बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या, कंपन्या, सार्वजनिक लोकांसह वेळोवेळी विविध ग्राहकांसाठी व्यवसाय प्रतिनिधी/व्यवसाय सुविधा देणारा किंवा अधिकृत एजंट/स एजंट यांचा व्यवसाय करणे समाविष्ट आहे. सेक्टर उपक्रम, म्युच्युअल फंड, व्हेंचर फंड, ट्रस्ट, सोसायटी कॉर्पोरेशन, केंद्र सरकार, राज्य सरकारे, अर्ध-सरकारी संस्था.
5. कंपनीचे मुख्य कार्य महिलांना समुहा अंतर्गत त्यांच्या गरजेनुसार लहान कर्ज अल्प मुदती करिता वितरित करणे व कर्ज वितरित केल्यानंतरच्या सेवा कर्ज अधीकारीचे (लोन ऑफिसर) माध्यामातून प्रदान करणे हा आहे.

मी अतुल समाधान पाटील रा. रावेर ता. खानापूर जि. जळगाव-४२५५०८

Scanned with OKEN Scanner

स्पंदना स्फूर्ती फायनान्शिअल ली. मध्ये मागील ०६ वर्षापासून या कंपनीत असून ०४ महिन्यापासून शेंगाव येथे शाखा अधिकारी म्हणून कार्यरत आहे. माझ्या अखत्यारीत एकूण ०६ कर्मचारी त्या पैकी गैर-अर्जदार- १ शुभम पंजाबराव आठवले (लोण ऑफिसर) व गैर-अर्जदार- २जितेंद्र यशवंत चव्हाण (ब्रॅन्च मॅनेजर) हे कर्मचारी म्हणून गेल्या ०१ वर्षांपासून शेंगाव शाखेत कार्यरत होता. गैर-अर्जदार- १ शुभम पंजाबराव आठवले (लोण ऑफिसर) याचे मुख्य कार्य त्याला प्रदान केलेल्या कर्ज खातेदारांना सेवा देणे जसे कर्ज देणे, कर्जाचा हप्ता कर्ज तकत्यानुसार प्रत्यक्ष खातेदारा कडे जाऊन रोख स्वरूपात घेऊन कंपणीच्या सॉफ्टवेअर मध्ये नोंद करणे व रोख स्वरूपात आणलेले किस्तीचे पैसे शेंगाव कार्यालयात जमा करणे होते. हे दैनंदिन कार्य होते.

मी कर्मचाऱ्या सोबत वासुलीदारांच्या मिटींगच्या स्थळावर भेट दिली व वसुलीदार यांचे कडून वसुली करण्या करिता गेलो असता असे निर्देशनास आले की गैरअर्जदार - १ शुभम पंजाबराव आठवले (लोण ऑफिसर) याने साधारणतः १६ फेब्रुवारी २०२३ ते १६ जुलै २०२५ पर्यंत ०७ सदस्यांची व कंपनीची फसवणूक केली आहे असे आमच्या लक्षात आले त्यामध्ये ७८४००/- रुपये इतकी रक्कम गैरअर्जदार - १ शुभम पंजाबराव आठवले यांनी शेंगाव या ऑफिस मध्ये वसुली केलेली रक्कम जमा करणे अपेक्षीत होते. परंतु, त्याने रक्कम जमा न करता स्वतःसाठी वापरले. त्यामुळे, गैरअर्जदार शुभम पंजाबराव आठवले याने कंपनीची व कर्ज खातेदारांची आर्थिक फसुवणुक केली असे आढळले.

त्याचप्रमाणे, आमचे ऑडिट चालू असतांना अभिलाष पाटील (ऑडिटर) पडताळणी करत असतांना असे निर्दशनास आले की गैर-अर्जदार- २ जितेंद्र यशवंत चव्हाण (ब्रॅन्च मॅनेजर) याने साधारणतः २९ एप्रिल २०२५ ते १९ जुलै २०२५ पर्यंत ०३ सदस्यांची व कंपनीची फसवणूक केली आहे असे आमच्या लक्षात आले त्यामध्ये ४६३१०/- रुपये इतकी रक्कम गैर-अर्जदार- २ जितेंद्र यशवंत चव्हाण (ब्रॅन्च मॅनेजर) यांनी शेंगाव या ऑफिस मध्ये वसुली केलेली रक्कम जमा करणे अपेक्षीत होते. हे प्रकरण उघडीस येत परेंत त्याने त्या रक्कम पैकी ११११२०/- रुपये किस्त स्वरूपात कर्जधारकाच्या खात्यात जमा करत असे. आता उर्वरित अपहार ३५१९०/- रुपये इतकी आहे.

गैरअर्जदार – ३ यशकुमार कळसकर याने साधारणतः ०५ जुलै २०२५ ते ०६ जुलै २०२६पर्यंत ०१ सदस्यांची व कंपनीची फसवणूक केली आहे असे आमच्या लक्षात आले त्यामध्ये ८५४०/- रुपये इतकी रक्कम गैरअर्जदार – ३ यशकुमार कळसकर यांनी रक्कम जमा न करता स्वतःसाठी वापरले.

आम्ही त्यांना वार वार तोंडी सूचना देऊन सुद्धा त्याने कंपनी च्या कार्यालयात अजून पर्येत आपणा कडून झालेल्या सदस्यांची अपहार रक्कम आज पर्येत काहीही भरणा झालेला नाही. आजपरेन्त त्यांने कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही त्यामुळे आमची दिशाभूल करत आहे.

यावरून गैर-अर्जदार- १ शुभम पंजाबराव आठवले गैर-अर्जदार- २ जितेंद्र यशवंत चव्हाण आणि गैरअर्जदार – ३ यशकुमार कळसकर यांनी त्या कालावधीत सदस्यांकडून पैसे स्विकारून कंपनीत जमा केले नाहीत. यावर या गुन्ह्यात सहभाग दिसून येत आहे. करिता त्याबाबत त्याने केलेल्या गैरकृत्याची माहिती आपणास देण्यात येत आहे.

करिता मेहरबान साहेबांना अशी विनंती करण्यात येते कि,आमची तक्रार रीतसर नोंदवून घेऊन प्रथम माहिती अहवाल आम्हाला देण्यात यावा हि नम्र विनंती

वरील सर्व प्रकार घडल्या मुळे आम्ही पोलीस स्टेशन, शेंगाव येथे तक्रार नोंदवत आहोत. करिता तक्रार अर्ज सादर.

Rajapeth S.O (444601) Counter No.1
SP-D EM451505485IN IVR:246607211411[illegible]
14-11-2025 15:19:02,20(Actual)gms,
To: THE POLICE INSPETOR, KHANGAON
Khamgaon H.O, MAHARASHTRA - 444303
From:SPANDARA SPHOORTY-444303
(Base:47.00)

Track@ www.indiapost.gov.in Dial-18002666868

भारतीय डाक
India Post

सही

SPANDANA SPHOORTY FINANCIAL LTD. BRANCH SHEGAON

शाखा अधिकारी
अतुल समाधान पाटील
स्पंदना स्फूर्ती फायनान्शिअल लिमिटेड
मो. ९५४५३२१४०५

Scanned with OKEN Scanner